दै. देशोन्नती दि. ०२/०७/२०२४

# तरुणींची पर्स पळविणारे दोघेजण जेरबंद



■ इतवारा उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या पथकाची कारवाई
■ १ लाख ९१ हजाराचा मुद्देमाल जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड :** इतवारा विभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्या पथकाने १ जुलै रोजी केलेल्या कारवाईत स्कुटीवरील तरुणीची पर्स पळविणाऱ्या आरोपींना अवघ्या २४ तासात जेरबंद करुन त्यांच्याकडून १ लाख ९१ हजाराचा मुद्देमाल जप्त केला.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशावरून इतवारा उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक यांच्या सुचनेवरुन उपविभाग इतवारा गुन्हे शोध पथकातील पोलीस अंमलदार पोना अर्जुन मुंडे, पोकॉ चंद्रकांत स्वामी, संतोष बेल्लुरोड, श्रीराम दासरे, हे पोलीस उप विभाग इतवारा व नांदेड शहर हद्दीत पाहिजे फरारीमधील आरोपी शोध व अवैध धंद्यावर कार्यवाही करत असताना १ जुलै रोजी पोलीस स्टेशन भाग्यनगर गुरन २८२/२०२४ कलम ३९२,३४ भादवी व पोलीस स्टेशन विमानतळ गुरन १४४/२०२४ कलम ३७९ भादवीमधील आरोपी हे नॅशनल परमेंट लस्सी बाफना टी- पाईंट येथे थांबुन असल्याची माहिती मिळाली. या माहितीवरून सदर ठिकाणी जाऊन पथकाने परमेश्वर ऊर्फ गोलु मुसळे (२४) रा. हस्तरा ता. हदगाव व विष्णु शिरफुले (१९) रा.मु.पो. कामारी ता. हिमायतनगर ह.मु. उल्हास नगर, तरोडा बु. या दोघांना ताब्यात घेऊन विचारपुस केली असता त्यानी वरील गुन्हयाची कबुली दिली आहे. त्यांच्याकडून गुन्हयात वापरलेली मोटार सायकल, दोन मोबाईल, इयर बडस, नगदी रक्कम तसेच पोलीस स्टेशन विमानतळ मधील एक मोटार सायकल असा एकुण १ लाख ९१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून आरोपीसह मुद्देमाल भाग्यनगर पोलिसांच्या ताब्यात दिला आहे. पुढील तपास पोउपनि विनोद देशमुख हे करीत आहेत.